महाराष्ट्र शासन
वनविभाग
<u>मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली</u>

# सुधारीत जाहीरात दिनांक : २९ /१२/२०१२

## गट-क मधिल रिक्त पदांची भरती २०१२

जाहिरात क्रमांक :- कक्ष-१(३)/आस्था/गड/१२.१३/ दिनांक : २९ डिसेंबर २०१२

मुख्यवनसंरक्षक, प्रादेशिक, गडचिरोली यांचे अखत्यारीतील गडचिरोली जिल्हयात विखुरलेल्या व दुर्गम भागात असलेल्या विभाग व परिक्षेत्र कार्यालयामध्ये रिक्त असलेल्या **गट-क** संवर्गामधिल सरळसेवेने भरावयाची पदांकरीता भरती करण्यांत येणार आहे. निवड प्रक्रियेद्वारे भरती केलेल्या उमेदवारांना गडचिरोली जिल्हयातच नोकरी करणे बंधनकारक राहील. त्यांची अन्यत्र बदली होणार नाही. कर्तव्याचा भाग म्हणून निवड केलेल्या उमेदवारांना गडचिरोली जिल्हयामध्ये विखुरलेल्या स्वरुपात दुर्गम व जंगल क्षेत्रामध्ये असलेल्या कार्यालय व कामाचे ठिकाणी मुक्कामी राहून कामे करावी लागणार आहेत त्याच बरोबर सातत्याने प्रवास करावा लागणार आहे. त्यामुळे **अपंग उमेदवार पात्र ठरत नाहीत**, याची नोंद घ्यावी.

वनविभागातील गडचिरोली वनवृत्तातील गट क संवर्गातील **लेखापाल / सर्व्हेक्षक / भांडारपाल** पदासाठी पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन (online) पध्दतीने विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सुचना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल) या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/forestgad या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहीत केलेले नमुना अर्ज संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात व अनुषंगिक सुचना काळजीपूर्वक वाचावी.

उपरोक्त संवर्गातील रिक्त पदसंख्या, त्या पदाकरीता विहीत केलेली वेतनश्रेणी / शैक्षणिक अर्हता अनुभव / वयोमर्यादा इत्यादिचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1) <u>पदांचा तपशिल :– लेखापाल / सर्व्हेक्षक / भांडारपाल</u>

| संवर्ग | शैक्षणीक पात्रता | अ. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमा प्र | इमा व | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लेखापाल | पदवीधर व MSCIT | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २(१) | ३ |
| सर्व्हेक्षक | HSC व सर्व्हेक्षक प्रमाणपत्र | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | २ |
| भांडारपाल | SSC व अनुभव | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

उपरोक्त पदांकरिता महिला समांतर आरक्षित पदांची संख्या कंसामध्ये नमुद केलेली आहे.
**तसेच जाहिरातीत उल्लेख केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**
**लेखापाल, सर्व्हेक्षक , भांडारपाल या पदाकरीता अपंग पात्र ठरत नाही.**

2) वेतनश्रेणी व अर्हता

<u>लेखापाल पदाची वेतनश्रेणी व अर्हता</u>

1.0 **वेतनश्रेणी :– ( पे बॅंड रु. 5200 – 20200, ग्रेड पे रु. 2800 )**
2.0 **शैक्षणीक पात्रता :–** उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापिठातुन कोणत्याही शाखेतील पदवी परिक्षा उत्तीर्ण असावा. संगणक उत्तीर्ण असावा.
3.0 **वयोमर्यादा :–** उमेदवाराचे वय दिनांक 31.12.2012 रोजी किमान 21 वर्षापेक्षा कमी व कमाल 33 वर्षापेक्षा जास्त नसावे.

<u>सर्व्हेक्षक पदाची वेतनश्रेणी व अर्हता</u>

1.0 **वेतनश्रेणी :– ( पे बॅंड रु. 5200 – 20200, ग्रेड पे रु. 2400 )**
2.0 **शैक्षणीक पात्रता :–** (1) उच्च माध्यमीक शालांत परिक्षा (HSC) उत्तीर्ण केली आहे आणि
(2) ज्यांनी मान्यताप्राप्त संस्थेचे सर्व्हेक्षक प्रशिक्षण पाठयक्रम प्रमाणपत्र धारण केले आहे.
(3) संगणक उत्तीर्ण असावा.
3.0 **वयोमर्यादा :–** उमेदवाराचे वय दिनांक 31.12.2012 रोजी किमान 18 वर्षापेक्षा कमी व कमाल 33 वर्षापेक्षा जास्त नसावे.

भांडारपाल पदाची वेतनश्रेणी व अर्हता

**1.0 वेतनश्रेणी :— ( पे बॅंड रु. 5200 — 20200, ग्रेड पे रु. 2400 )**

**2.0 शैक्षणीक पात्रता :—** अ) उमेदवार हा एस.एस.सी. (10 वी) परीक्षा उत्तीर्ण किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावा.
ब) शासकीय कार्यालयात भांडारपाल पदावर काम केल्याचा 3 वर्षाचा अनुभव असावा.
किंवा इंजिनिअरींग कामाचा अनुभव असावा.
क) इंजिनिअरींगचे वैज्ञानिक विविध स्टुल्स / उपकरणे / सामान इ. अनुभव असावा

**3.0 वयोमर्यादा :—** उमेदवाराचे वय दिनांक 31.12.2012 रोजी किमान 18 वर्षापेक्षा कमी व कमाल 33 वर्षापेक्षा जास्त नसावे.

**1) उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम.**

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षापर्यत. इतर आरक्षणासाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली उच्च वयोमर्यादा.

(दोन) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक मासैक—10—10/प्र.क्र.279/10/16—अ, दिनांक 20 ऑगष्ट, 2010 अन्वये माजी सैनिकासाठी शासन सेवेतील वर्ग—3 पदासाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील.

(तीन) पात्र खेळाडुंच्या बाबतीत 5 वर्षापर्यंत

(चार) प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरीता तसेच मागासवर्गीय उमेदवाराकरीता सरसकट कमाल वयोमर्या 45 वर्ष राहील सुशिक्षित बेरोजगार व अंशकालीन उमेदवाराकरीता सरसकट कमाल वयोमर्यादा 46 वर्ष राहील.

(पाच) वनविभागातील अधिसंख्य वनमजूरांना महसूल व वनविभाग शासन शुध्दीपत्रक क्र. एलएबी 1094/प्रक्र252/फ—9, दिनांक 31/07/2003 नुसार वयोमर्यादेसंबंधी अट शिथीलक्षम.

(सहा) पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी 46 वर्षापर्यंत.

**(सात) वनविभागातील अधिसंख्य वनमजुरांना ३३ वर्ष अधिक वनविभागातील सेवेचा कालावधी तसेच वनविभागातील रोजंदारी मजुरांकरीता ४६ वर्षापर्यंत (महसुल व वनविभाग शासन निर्णय क्र. बैठक-२०१०/प्र.क्र.७/फ-९ दिनांक १६ ऑक्टोबर २०१२ नुसार)**

**४) निवड करण्याची पद्धत व परिक्षा :** लेखी व मुलाखत परिक्षा घेण्याबाबत.

**४.०१ लेखापाल** पदाकरीता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे हया पदांकरीता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतू मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमीक शालात परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. व २५ गुणांची तोंडी परिक्षा (मुलाखत) घेण्यांत येईल. व गुणवत्तेच्या गुणानुक्रमानुसार निवड करण्यांत येईल.

**४.०२ सर्व्हेक्षक** पदासाठी व्यावसायीक चाचणी ( Proficiency Test ) घेण्यात येईल. तसेच सदर पदासाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी २५ गुण ठेवून १०० गुणांची लेखी परीक्षा, ८० गुणांची व्यावसायीक चाचणी व मुलाखतीसाठी २० गुण इतके गुण ठेवून उमेदवारांची निवड करुन गुणवत्ता पात्र उमेदवारांच्या नियुक्तीसाठी निवड करण्यात येईल. जे उमेदवार लेखी परिक्षेत उत्तीर्ण होतील अशानाच ही व्यावसायीक चाचणी देता येईल.

**व्यावसायीक परिक्षेकरीता पात्रता :-** सर्व्हेक्षक पदाकरीता लेखी परिक्षेत खालील प्रमाणे गुण प्राप्त करणारे उमेदवार व्यावसायीक परिक्षेकरीता पात्र होतील.

| | | |
|---|---|---|
| सर्वसाधारण (खुला) व इतर मागास प्रवर्ग | : | ४५ टक्के गुण |
| मागासवर्गीय प्रवर्ग, माजी सैनिक | : | ४० टक्के गुण |

**४.०३ भांडारपाल** पदाकरीता कमीत कमी अर्हता माध्यमीक शालांत परिक्षा (इयत्ता १० वी) आहे सदर पदांकरीता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमीक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**४.०४ वरील परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तूनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.**

**५) मौखीक (मुलाखत) परिक्षा :** लेखापाल, भांडारपाल पदासाठी २५ गुणांची मौखीक परिक्षा राहील, सर्व्हेक्षक पदाकरीता २० गुणांची मौखीक परिक्षा घेण्यांत येईल.

**६) लघु यादी :-** लघु यादीतील उमेदवारांची संख्या खालील प्रमाणे असेल :-

लेखापाल व भांडारपाल पदास लेखी परिक्षेत आणि सर्व्हेक्षक पदासाठी लेखी व व्यावसायीक परिक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणानुक्रमानुसार सामाजीक व समांतर आरक्षण विचारात घेवून मुलाखतीसाठी बोलाविण्यात येणा-या उमेदवारांची संख्या रिक्त पद संख्येचा ५ पटीत मात्र उमेदवारांच्या १५ इतक्या संख्येपर्यंत मर्यादित राहील.

एखादा उमेदवार लेखी परीक्षेत अधिक गुण मिळवून देखील मुलाखतीला गैरहजर राहील्यास त्याची नियुक्तीसाठी शिफारस केली जाणार नाही. मात्र एखाद्या उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर अशा उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

## ७) निवडसूचित समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या :-

निवडसूचिमध्ये समाविष्ट करावयाच्या प्रवर्गनिहाय रिक्त पदे अधिक रिक्त पदाच्या ५० टक्के इतक्या अतिरीक्त उमेदवारांचा समावेश असेल. अतिरीक्त उमेदवाराच्या संख्येची परिगणना करतांना उमेदवाराची संख्या अपूर्णांकात येत असल्यास पुढील संख्या विचारात घेण्यात येईल. त्याचप्रमाणे निवडसूचीसाठी रिक्त पदांची संख्या विचारात घेताना लेखी परीक्षेच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या महिन्याच्या अखेरपर्यंत निवड समितीकडे लेखी स्वरुपात प्रत्यक्ष मागणी प्राप्त झालेली असेल तितकीच रिक्त पदे निवडसूचीसाठी विचारात घेण्यात येईल.

## ८) निवडसूचीची कालमर्यादा :-

निवडसमितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा नविन सूची तयार करण्यासाठी सेवाभरतीची जाहिरात देण्यात येईल. त्या दिनांकापर्यंत यापैकी जो दिनांक आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील त्यानंतर करण्यात आलेली निवडसूची व्यपगत होईल.

निवडसमितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून जेष्ठतेनुसार उमेदवाराची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जाती प्रमाणपत्र किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडसूचीतील अतिरीक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

## 9) सर्वसाधारण अटी :–

९.१ सेवा प्रवेश नियमातील अटीनुसार संबंधीत संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता येणे आवश्यक आहे.

९.२ उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा. **(अधिवास प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे).**

९.३ सामान्य प्रशासन विभाग क्र.एस.आर.व्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८१/१३-अ, दिनांक १६/३/१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा., अ.ज., वि.जा. (अ), भज(ब), भज(क), भज(ड), विमाप्र, इमाव आणि खुला प्रवर्ग ) विशेष आरक्षणानुसार होणा-या राखीव पदांची संख्या पदाचा तपशील या शिर्षा अंतर्गत दर्शविण्यात आलेला आहे. **समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर पदे त्या-त्या सामाजिक प्रवर्गातुन भरण्यात येतील.**

९.४ वि.जा. (अ), भज(ब), भज(क), भज(ड), विमाप्र व इमाव या प्रवर्गातील उमेदवारांसाठी शासन परिपत्रक सामान्य न्याय सांस्कृतीक न्याय व विशेष साहाय्य विभाग क्र.सी.बी.सी.-१०/२००६/प्र.क्र.१५/मा.व.क.-५ दिनांक ३०/६/२००६ सोबतच्या सुधारीत नमुन्यात त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र (दि. ३१.३.२०१२ पर्यंत वैधता असलेले) सादर करणे आवश्यक आहे. सदरचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास उमेदवाराचे अर्ज संबंधित प्रवर्गाकरिता पात्र होणार नाही.

खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्गीय, भटक्या जमाती (क) व भटक्या (ड) या प्रवर्गातील महिलांसाठी असलेले ३०% आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ती/गटातील (क्रिमीलेअर) कुटूंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

९.५ महिला आरक्षणाकरीता अर्ज करतांना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी त्यांची जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे (दि. ३१.३.२०१२ पर्यंत वैधता असलेले) सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९.६ खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडु उमेदवारांना खेळाडूसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय असणार नाही. तसेच मागास वर्ग प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूचे ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

९.७ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयांकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर या कार्यालयाकडे विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे अर्ज सादर करावा.

९.८ वनविभागात कार्यरत असलेल्या सर्व अधिसंख्य वनमजुरांनी ते ज्या पदाची पात्रता धारण करीत आहे त्या पदाकरीता विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे सरळमार्गाने अर्ज सादर करावा.

९.९ अनुभवाच्या बाबतीत तासीका, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणुन नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

९.१० पडताळणी अंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवाराची अंतिम निवड करणे जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे.

९.११ सेवा प्रवेश नियमानुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

९.१२ उमेदवारांना लेखी / व्यावसायीक परिक्षा व मुलाखती करीता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

९.१४ उमेदवारांना लेखी/मौखिक परिक्षेदरम्यान गणकयंत्र (Calculator)/भ्रमणध्वनी यंत्र ईत्यादी इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा वापर करता येणार नाही.

९.१५ उमेदवारांना ओळखपत्र (hall ticket), लहान कुटूंबासंबंधी प्रमाणपत्र (नमुना-अ), http://oasis.mkcl.org/forestgad या संकेतस्थळावरून प्राप्त करून घ्यावे.

९.१६ महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

**१०.०१ उमेदवारांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जानुसार त्यांना लेखी परिक्षेला बसण्याची परवानगी देण्यात येईल. लेखी परिक्षेनंतर गुणवत्ता यादीचे आधारे सामाजीक व समांतर आरक्षण विचारात घेवून ६.०० प्रमाणे तयार केलेल्या लघु यादीतील गुणानुक्रमे समावेश होणाऱ्या उमेदवारांचेच अर्ज, शैक्षणीक पात्रता, गुणपत्रीका, अधीवासी व जातीचे दाखले व समांतर आरक्षणाचे इ. तपासले जातील. अर्जात त्रुटी आढळल्यास तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती खोटी आढळल्यास सदर उमेदवारास पुढील फेरीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.**

10.01 गडचिरोली जिल्हयात विखुरलेल्या दुर्गम ठिकाणी कार्यालय व कामे सुरु आहेत त्या ठिकाणी कर्तव्याचा भाग म्हणुन उपस्थित राहुन कामे करावी लागतील त्यासाठी फिरती करुन कामे करावयाची आहेत.

**10.02 गडचिरोली जिल्हयाबाहेर बदली होणार नाही. तसेच असा प्रयत्न करणार नसल्याबाबत लेखी हमी पत्र / प्रतिज्ञापत्र लिहुन देणे बंधनकारक आहे. गडचिरोली जिल्हयाबाहेर बदलीसाठी प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्ती रदद करण्यात येईल.**

10.03 संगणकावर काम करणे आवश्यक आहे. आवश्यक तेथे प्रशिक्षण घेवून कामे करावी लागतील.

## 11) सेवाशुल्क :–

उमेदवाराने उपरोक्त पदासाठी आवश्यक असलेले शुल्क खालीलप्रमाणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसिएल) या संस्थेच्या मार्गदर्शक सुचणेमध्ये दिलेल्या पध्दतीने जवळच्या भारतीय स्टेट बँक शाखेमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

इंटरनेटद्वारे ऑनलाईन रजिस्ट्रेशन केल्यानंतर प्राप्त झालेले चलन घेवून ते खालील नमुद केल्याप्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखेमध्ये सेवाशुल्क फी भरणा करावी. त्यानंतर दोन दिवसानंतर ऑनलाईनद्वारे activate झाल्यावर उर्वरीत असलेला अर्ज पुर्णपणे भरावा.

| प्रवर्ग | शुल्क |
|---|---|
| खुला | ३०० |
| मागासवर्गीयांसाठी | १५० |
| माजी सैनिक | नाही |

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमाक आरटीए-१०७९/०/४८२/१६अ, दिनांक ३ जुलै, १९८० मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये माजी सैनिकांना परिक्षा फी तसेच अर्जाचे फी मध्ये सुट दिलेली आहे.

## 12) निवड प्रकीयेचे वेळापत्रक

**निवड प्रक्रियेचा कार्यक्रम (वेळापत्रक) खालील प्रमाणे राहील.**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंद (रजीस्ट्रेशन) करणे व चलन प्रिंट घेण्याचा कालावधी | २८.१२.२०१२ | ११.१.२०१३ |
| २ | संगणकीय चलनाद्वारे **स्टेट बँक ऑफ इंडिया** (SBI) यांचे शाखेमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | २८.१२.२०१२ | १४.१.२०१३ |
| ३ | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दि. १४.१.२०१३ पर्यंत भरती प्रक्रीया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरणे व प्रिंट घेण्याचा कालावधी | दि. १६.१.२०१३ रात्री २३.५९ पर्यंत | |
| ४ | लेखी परिक्षे बाबत उमेदवाराने इंटरनेटवर वेळापत्रक/ सुचना पाहावे. | दि. २१.१.२०१३ | २३.१.२०१३ |

**टिप :- नमुद तारखांमध्ये बदल करण्याचे संपूर्ण अधिकार राखून ठेवलेले आहेत. वेळापत्रकात झालेला बदल कार्यालयाचे सूचना फलकावर लावण्यात येईल. तसेच** http://oasis.mkcl.org/forestgad व www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांत येईल.

**१३) अर्ज करण्याची पध्दत** :-

१३.०१ ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत (एमकेसीएल) या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/forestgad या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहीत केलेला नमुना अर्ज सदर संकेतस्थळावर उपलब्ध होईल. उमेदवार त्याचा अर्ज इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी भरु शकेल. ऑनलाईन अर्ज भरण्यास अडचण आल्यास नजीकच्या एमकेसीएल यांच्या अधिकृत स्थानिक प्रशिक्षण केंद्राची मदत व मार्गदर्शन घेवू शकतील. अधिकृत प्रशिक्षण केंद्राची (ALC-Authorised Learning Center) पत्त्यासह माहिती http://oasis.mkcl.org/forestgad या संकेतस्थळावर देखिल उपलब्ध आहे. **अर्ज भरणेपुर्वी उमेदवाराने जाहीरात काळजीपुर्वक वाचावे.**

१३.०२ **प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज व फी भरणे आवश्यक राहील.**

१३.०३ उमेदवाराने उपरोक्त नमुद केलेल्या संस्थेच्या संकेतस्थळावर (website) Apply online या लिंकवर क्लिक करावे व सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी यानंतर रजिस्टर (button) या बटनावर क्लिक करावे.

**१३.०४ नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application form No.) व पासवर्ड (Password) काळजीपुर्वक स्वत:कडे नोंदकरुन पुढील प्रक्रियेसाठी जपुन ठेवावा.**

१३.०५ नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने प्रिंट चलन (print challan) या बटनावर क्लिक करून प्रिंट करावे.

१३.०६ बँक चलनावर नमूद केलेली फी स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखेमध्ये जाहिरातीत दिलेल्या मुदतीचे आंत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील. व त्याची एक प्रत स्वत:कडे जपुन ठेवावी. फी भरण्यासाठी बँकेने आकारलेले शुल्क उमेदवाराने बँकेत भरावे.

१३.०७ बँकेत फी भरल्यानंतर उमेदवाराने आपला उर्वरीत अर्ज एक दिवसानंतर परंतु मुदतीचे आंत online भरावा.

१३.०८ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वतचा अद्यावत (Latest) फोटो व स्वत:ची स्वाक्षरी विहीत पद्धतीने स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य आहे.

१३.०९ उमेदवाराने संपूर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट दोन प्रतीत काढून ती स्वत:जवळ ठेवावी. व त्यापैकी एक प्रत ओळखपत्रासह लेखी परिक्षेचे वेळी / मौखीक परिक्षेचे वेळी सादर करावी.

१३.१० वरील प्रमाणे सर्व प्रक्रिया (उमेदवार नोंदणी, बँक प्रक्रिया, उर्वरीत अर्ज भरणे इ.) पुर्ण केल्यानंतर उमेदवार पुढील प्रक्रियेसाठी पात्र होईल.

१३.११ उमेदवाराच्या माहिती व मदतीकरीता एमकेसीएल पुणे यांच्या कॉल सेंटरवरील दुरध्वनी क्रमांक ९३२६५५२५२५ वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

**१४) महत्वाच्या सुचना :-**

१४.०१ पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. व कोणताही पत्रव्यहार केला जाणार नाही. वेळोवेळी सर्व सुचना इंटरनेटद्वारे http://oasis.mkcl.org/forestgad या वेबसाईटवर व या कार्यालयाचे सुचनाफलकावर देण्यांत येतील.

१४.०२ उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल नंबर काळजीपुर्वक भरावा.

१४.०३ उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणीक प्रमाणपत्रे व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरतांना काही त्रुटी राहील्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवाराने अर्ज परिपुर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. अंतीम निवडपुर्व कागदपत्र तपासण्याच्या वेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

१४.०४ गुणानुक्रमे व आरक्षण विचारात घेवून पात्र झालेल्या उमेदवारांची नांवे वनविभागाच्या www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर तसेच महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/forestgad या संकेतस्थळावर जाहिर करण्यात येतील.

१४.०५ लेखी परिक्षा ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने या परिक्षेत मिळालेल्या गुणांचे आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतर तसेच सामाजिक/समांतर आरक्षण निहाय लघुयादी निवड केली जाईल.

१४.०६ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्र या कार्यालयात नावनोंदणी केली असली तरी वरील पदांसाठी विहीत नमुण्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक राहील.

१४.०७ अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवारांनी आवश्यक सर्व तपशिल स्वत:जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पद्धतीने भरला आहे याची खात्री करावी. खोटी व चुकीची माहिती अर्जात दिल्यास त्यासाठी उमेदवार स्वत: व्यक्तीश: जबाबदार राहील व त्यासाठी तो भरतीप्रक्रीयेतुन अपात्र होईल. तसेच त्याचेवर फौजदारी कार्यवाही केली जावू शकेल.

**१५) भरती बाबत अर्जदारासाठी इतर आवश्यक सुचना :-**

१५.०१ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५.०२ महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील निर्देशानुसार मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्तीचे वेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१५.०३ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविल्या जाईल.

१५.०४ निवड झालेल्या उमेदवारांची गडचिरोली वनवृत्ताअंतर्गत कोठेही नियुक्ती होवू शकते.

१५.०५ लेखी परिक्षेत कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार केल्यास (कॉपी, गैरवर्तन इ.) उमेदवारास अपात्र करण्यांत येईल. तसेच फौजदारी कार्यवाही केली जावू शकेल.

१५.०६ लेखी/मौखीक परिक्षेच्यावेळी अर्जात दिलेल्या नमुन्यातील ओळखपत्र सोबत आणावे. सदरचे ओळखपत्र संपुर्ण भरती प्रक्रियेसाठी उमेदवाराने स्वत:चे जवळ बाळगणे आवश्यक आहे.

१५.०७ अंतीम निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय चाचणी (medical fitness) शल्य चिकित्सक, गडचिरोली यांचेमार्फत करण्यांत येईल.

**मुख्यवनसंरक्षक प्रादेशिक, गडचिरोली यांचेकडे निवड प्रक्रियेबाबत अटी/शर्ती /सुचना मध्ये बदल/सुधारणा किंवा रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यांत आलेले आहेत. त्रुटी निदर्शनास आल्यास त्याप्रमाणे वेळोवेळी सुधारीत आदेश निर्गमीत करण्यांत येतील.**

दिनांक : 29 डिसेंबर 2012

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
गडचिरोली.